दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ६२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२६ मे २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## कोरोना पॉझिटिव्हिटी रेट जास्त असणाऱ्या जिल्ह्यात गृह विलगीकरणास बंदी : आरोग्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील प्रमुख शहरांत जरी करोना रुग्णांची संख्या नियंत्रणात येत असली तरी राज्यातील १८ जिल्हे अजूनही रेड झोनमध्ये असून या जिल्ह्यात करोनाचा रुग्णांची संख्यांही अधिक आहे. या जिल्ह्यांसाठी आरोग्य विभागानं एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज म्युकरमायकोसिस या आजारासंदर्भात एक महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत आरोग्यमंत्री राजेश टोपे देखील उपस्थित होते. त्याच दरम्यान होम आयसोलेशनबाबतही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

'रेड झोनमध्ये असलेल्या ज्या १८ जिल्ह्यांत पॉझिटिव्हीटी रेट जास्त आहे त्या जिल्ह्यांना दोन सूचना देण्यात आल्या आहेत. एक म्हणजे होम आयसोलेशन बंद करा आणि कोविड केअर सेंटर वाढवा, व दुसरी कोविड केअर सेंटर वाढवून सगळ्या रुग्णांना कोविड सेंटरमध्ये आयसोलेट करण्यात येणार आहे.



१५ वित्त आयोगातून उपलब्ध निधीतून ग्रामपंचायतींनी २५ टक्के निधी हा करोना केअर सेंटर उभारणीसाठी वापरण्याचे आदेश देण्यात आले आहेत,' असं राजेश टोपे यांनी म्हटलं आहे. तसंच, राज्याचा रिकव्हरी रेट ९३ टक्के इतका आहे तर, पॉझिटिव्हीटी रेटदेखील कमी होत असल्याची माहिती राजेश टोपे यांनी दिली आहे.

ग्रामीण भागात आशा स्वयंसेविका आरोग्य विभागाचा कणा म्हणून ओळखल्या जातात. ग्रामीण भागातील कोरोनाची साथ रोखतानाच आता आशा स्वयंसेविकांना रॅपीड ॲण्टीजेन चाचणी आणि स्वयंनिदान चाचणी करण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले. राज्यात सुमारे ७० हजाराच्या आसपास आशा स्वयंसेविका आहेत.

'म्युकर मायकोसिसचे राज्यात २२४५ रुग्ण आहेत. आरोग्य विभानाने या आजाराला नोटिफाईट आजार म्हणून घोषित केलंय. त्याबाबतची माहिती शासनाला देणं बंधनकारक आहे. आजारासाठी लागणाऱ्या एम्फोटेरेसीन औषधाचं नियंत्रण केंद्राकडे आहे. केंद्र सरकारने औषध दिल्यावर आपण त्याचे प्रत्येक जिल्ह्यात वाटप करतो. त्यामुळे रुग्णांची माहिती देण्याच्या सूचना प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच या आजारावर मोफत उपचार करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्यासाठी ३० कोटी रुपयांची तरतूदही करण्यात आली आहे. या रुग्णांवर महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून मोफत उपचार करण्यात येत आहेत,' अशी माहिती आरोग्यमंत्र्यांनी दिली आहे.

## हळदीच्या कार्यक्रमात गोळीबार करणाऱ्यांना कामोठे पोलिसांनी केले गजाआड

### आरोपींना लोणावळा, पुणे परिसरातून कामोठे पोलिसांनी घेतले ताब्यात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमधील धाकटा खांदा गावात हळदी समारंभाच्या कार्यक्रमात गोळीबार केल्याची घटना घडली होती. हळदी कार्यक्रमात नाचत असताना धक्का लागल्याच्या क्षुल्लक कारणावरून तसेच पूर्ववैमनस्यातून जुना राग मनात ठेवून सदरचा प्रकार घडला होता. त्यावेळी आरोपीच्या दोन्ही साथीदारांकडे असलेल्या चॉपरने फिर्यादी यांना धाक दाखवून शिवीगाळ व दमदाटी केली होती. सदरच्या गुन्ह्याची नोंद कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. परंतु गोळीबार करणारे इसम पसार झाल्याने त्यांचा शोध कामोठे पोलिसांकडून केला जात होता.

सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी परिमंडळ-२ चे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन भोसले-पाटील, यांनी मार्गदर्शक सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता जाधव (तपासी अंमलदार) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे वेगवेगळे तपास पथक नेमले होते. त्याप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपींच्या ठाव ठिकाण्याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती नसताना, गुन्हयाचे घटनास्थळ ते मुंबई-पुणे एक्सप्रेसवे, गोवा रोड, उरण रोड व मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावरील टोल नाक्याचे सिसिटीव्ही फुटेज तपास करून सदरचा परिसर देखील पिंजून काढला. त्यानंतर आरोपी काम करत असलेल्या ठिकाणी काम करणारे व आरोपींचे जवळचे मित्र यांना विश्वासात घेवुन त्यांच्याकडे आरोपींबाबत सखोल चौकशी केली. त्याप्रमाणे आरोपी कोणकोणत्या ठिकाणी जाऊ शकतात याबाबत माहिती काढून आरोपींना अत्यंत शिताफीने लोणावणा, पुणे परिसरातुन ताब्यात घेतले. आरोपींकडून गुन्हयात वापरलेले हत्यार व गावठी बनावटीचे पिस्तुल हस्तगत करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे प्रशासनाकडून कोणतीही परवानगी न घेता हळदी समारंभाचे आयोजन केल्याप्रकरणी आयोजकांवर देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोणताही इसम अग्निशस्त्र किंवा त्यासारखी दिसणारी वस्तु व कोणत्याही प्रकारचे हत्यार जवळ बाळगताना दिसुन आल्यास नागरिकांनी तात्काळ पोलीसांना माहिती देवून सहकार्य करावे आणि भयमुक्त राहावे.

## संक्षिप्त...

### राज्यात आज कोरोनाच्या २४,१३६ नव्या रुग्णांचे निदान

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई: गेल्या काही दिवसांपासून राज्यातील रोजच्या नव्या करोना बाधित रुग्णांची संख्येत घसरण होत असल्याने राज्याला मोठा दिलासा मिळत असल्याचे चित्र आहे. २४ तासांत राज्यात २४ हजार १३६ नव्या करोना बाधित रुग्णांचे निदान झाले आहे.

तर आज एकूण ३६ हजार १७६ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. याबरोबरच राज्यातील सक्रिय रुग्णांची संख्या देखील कमी होत असून ती आज ३ लाख १४ हजार ३६८ वर आली आहे.

आज राज्यात एकूण ६०१ करोना बाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. या बरोबर सध्या राज्यातील मृत्यूदर १.६१ टक्के इतका आहे. याबरोबर राज्यात आज ३६ हजार १७६ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत, तर आतापर्यंत एकूण ५२ लाख १८ हजार ७६८ रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९२.७६ टक्क्यांवर पोहोचले आहे.

राज्यातील ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या ३ लाख १४ हजार ३६८ इतकी झाली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांमधील सक्रिय रुग्णांच्या संख्येतही घट होताना दिसत आहे. राज्यातील सक्रिय रुग्णांचा जिल्हानिहाय विचार करता पुणे जिल्ह्यात सक्रिय रुग्णांची संख्या सर्वाधिक आहे. पुण्यात एकूण ४५ हजार ६४८ इतके रुग्ण आहेत. मुंबई पालिका हद्दीत हा आकडा २७ हजार ८५५ इतका आहे. ठाणे जिल्ह्यात सध्या २३ हजार ७०२ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. तर नागपूर जिल्ह्यात ही संख्या १४ हजार ५५६ इतकी झाली आहे. नाशिकमध्ये सक्रिय रुग्णांची संख्या १२ हजार ७९३ इतकी आहे.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९८२०३५५३४६

## बुधवारीही विविध गावांमध्ये जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**



माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ०२ जून रोजी ७० वा वाढदिवस आहे. वैश्विक महामारी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भारतीय जनता पक्ष पनवेलतर्फे पनवेल तालुका व महानगरपालिका क्षेत्रातील गरीब, गरजू नागरिकांना सामाजिक बांधिलकीतून जीवनावश्यक वस्तूंचे वाटप कार्यक्रमाला सोमवारपासून प्रारंभ झाले.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या सुयोग्य नियोजनातून तालुक्यातील गावागावांमध्ये गरजूंना अन्नधान्याचे वाटप करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने तिसऱ्या दिवशी बुधवार दिनांक २६ मे रोजी बोनशेत, टेंभोडे, नेवाळी, भोकरपाडा, चिंध्रण आदी गावांमध्ये जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे.

## रोहा तालुक्यातील विविध तलाठी कार्यालयांकरिता जागा हस्तांतरित

### महसूल प्रशासन अधिक गतिमान करण्याच्या दृष्टीने पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचे धडाडीचे निर्णय

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

तलाठी कार्यालय हे नागरिकांसाठी ग्रामीण स्तरावरील अत्यंत महत्त्वाचे कार्यालय मानले जाते. या कार्यालयातून जनतेची महसूलविषयक सर्व प्रकारची महत्त्वाची कामे केली जातात.



ग्रामीण भागातील जनतेची महसूलविषयक कामे सुलभ व्हा-वीत, प्रशासन गतिमान व्हावे तसेच येथील अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या व या कार्यालयात विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांच्या दृष्टीने या तलाठी कार्यालयाची इमारत सुसज्ज व अद्ययावत असणे, ही काळाची गरज होती, या दृष्टीने पालकमंत्री या नात्याने कु.आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष देण्यास सुरुवात केली. या पार्श्वभूमीवर शेणवई, चांडगाव, खांब, खारगाव, धामणसई, दुरटोली, सारसोली, बेलखार, पुगाव, वाली या तलाठी कार्यालयांच्या इमारतींच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी केली होती. याबाबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार तलाठी सजा शेणवईसाठी क्षेत्र ०.०३.०० हे.आर., तलाठी सजा चांडगावसाठी क्षेत्र ०.०३.०० हे.आर., तलाठी सजा खांबसाठी क्षेत्र ०.०३.०० हे.आर., तलाठी सजा खारगावसाठी क्षेत्र ०.०३.०० हे.आर., तलाठी सजा धामणसईसाठी क्षेत्र ०.०३.०० हे.आर., तलाठी सजा दुरटोलीसाठी क्षेत्र ०.०३.०० हे.आर., तलाठी सजा सारसोलीसाठी क्षेत्र ०.०३.०० हे.आर., तलाठी सजा कोकबनसाठी क्षेत्र ०.०३.०० हे.आर., तलाठी सजा पुगावसाठी क्षेत्र ०.०३.०० हे.आर., तलाठी सजा वालीसाठी क्षेत्र ०.०३.०० हे.आर., ही जमीन महसूल मुक्त व सारामाफीने संबधित तलाठी कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत.

यामुळे खऱ्या अर्थाने महसूल प्रशासन गतिमान होऊन जनतेला महसूल विषयक सोयी सुविधा सुलभतेने मिळतील. विविध प्रशासकीय कार्यालयांच्या नव्या इमारतीसाठी व अद्ययावतीकरणासाठी पालकमंत्री कु. आदिती तटकरे करीत असलेल्या पाठपुराव्यामुळे प्रशासन निश्चितच गतिमान होण्यास मोठा हातभार लागणार आहे. यामुळे जिल्ह्यातील जनतेमध्ये पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या कामाविषयी सर्वत्र समाधान व्यक्त केले जात आहे.

## माणगांवात अनेकदा विज खंडीत होत असल्याने ग्राहकांचे नुकसान



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांवात महावितरणचे अघोषीत लोडशेडिंग सुरु दिवसातुन अनेकदा विज खंडीत होत असल्याने ग्राहक हैराण होत आहेत. अशातच सकाळी ९.३० ते १७.३० जवळपास आठ तास लाईन खालील वाढलेली धोकादायक झाडे तोडण्यासाठी शट डाऊन घेत लाईट घालवली. लगेच दोन दिवसातच परत माणगांव वीर यशवंत घाडगे स्मारक येथील झाडाच्या फांद्या तोडण्यासाठी पुन्हा शटडाऊन, लाईट घालवली. तसेच गेले आठवडा पेक्षा जास्त दिवस, दिवसातुन अनेकदा माणगांव उतेखोल येथील दररोज लाईट जातोय याला कारण म्हणतात कांदळगाव मुख्य महावितरण केंद्रातूनच वीज खंडित होत आहे. म्हणजेच ट्रीप होत असल्याचे कारण संबंधित महावितरणचे अधिकारी व कर्मचारी सांगत आहेत.

यामुळे ग्राहकांचे या उन्हाळ्याचे दिवसात उष्णतेमुळे अतोनात हाल होत आहेत. तसेच अनेक छोटे मोठे व्यवसाय व सध्या कोरोनामुळे सर्वच व्यवहार वर्क फ्रॉम होम म्हणजेच घरीच बसुन संगणकिय प्रणाली अर्थात ऑनलाईन इंटरनेटवरुन होत आहेत. तसेच अनेक छोटे मोठे उद्योग व्यवसाय, पावसाळ्यापूर्वीची कामे वीजे शिवाय करणे अशक्य आहेत. महावितरणच्या अशा प्रकारे होत असलेल्या खंडित सेवे मुळे अनेकांचे विद्युत उपकरणांचे नुकसान होत आहे. तसेच संबंधित महावितरण कार्यालयाचे लँड लाईन टेलीफोन ..../२

## उरण पुर्व भाग दोन दिवसांपासून अंधारात



**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

महावितरणच्या वीज वाहिन्यांमध्ये अचानक बिघाड झाल्यामुळे मागील दोन दिवसांपासून उरण पुर्व भागाचा वीज पुरवठा खंडीत झाला आहे. सोमवार दि.२४ पहाटे वीज खंडीत झाली आहे मात्र मंगळवार संध्याकाळ पर्यंत तरी वीज पुरवठा सुरळीत झाला नव्हता. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तात्पुरत्या स्वरूपात जेएनपीटी फिडर वरून वीज जोडून नागरीकांना काहीसा दिलासा दिला मात्र या फिडरवर जास्त वीजेचा दाब असल्याने अतिशय कमी दाबाने वीज पुरवठा होत होता. त्यामुळे कोणतीही उपकरणे या वीजेवर चालत नसल्याने नागरीकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

सोमवारी सकाळी ५ वाजता अचानक वीज पुरवठा खंडीत झाला. या नंतर महावितरणने ..../२

> बीपीसीएल जवळच्या खाडीमध्ये वीज पुरवठा करणाऱ्या केबलमध्ये दोष निर्माण झाला आहे. कर्मचारी दिवस-रात्र तो दोष शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र या ठिकाणी पाणी आणि चिखल असल्यामुळे काम करणे अवघड बनले आहे. मंगळवार संध्याकाळ पर्यंत उरण पुर्व भागाचा वीज पुरवठा सुरळीत होईल.
>
> **हरिदास चोंढे (अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण)**

## महाड-पोलादपूर दरम्यान जुने-नवे स्टील चोरीच्या घटनांना ऊत

### लोहारमाळ येथे वीजेचा जुना पोल कापताना व्हिडीओ व्हायरल

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगत विविध अवैध धंद्यांना ऊत येत असताना होणाऱ्या अर्थपूर्ण दूर्लक्षात सध्या मोठ्या प्रमाणात भर पडली असल्याचे दिसून येत आहे. सोमवारी लोहारमाळ येथे रस्त्यालगत पडलेला वीजेचा जुना लोखंडी खांब ट्रकमधून बाहेर दिसणार नाही एवढाच कापून ठेवताना एक व्यक्ती दिसून आल्याचा एक व्हिडीओ महावितरणचे उपकार्यकारी अभियंता सूद यांना एका ग्रामस्थाने मोबाईलद्वारे पाठविल्यानंतर यासंदर्भात केवळ संबंधित कंपनीच्या प्रोजेक्ट मॅनेजरला तंबी देणारं पत्र पोलादपूर उपविभागाकडून



पाठविण्यात आले असले तरी हा प्रकार महाड-पोलादपूर दरम्यान सातत्याने सुरू असलेल्या जुने-नवे स्टील चोरीच्या घटनांपैकी असल्याची चर्चा सुरू आहे.

दरम्यान, याप्रकरणी पोलादपूर पो-लीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरूध्द फक्त एनसी गुन्हा दाखल दाखल झाला आहे.

पोलादपूर तालुक्यात तुर्भे सबस्टेशनजवळ महावितरणचे ज्ञानेश्वर माने हे फिर्यादी सोमवारी सायंकाळी साडेचार वाजता आले असता त्यांना एलटीलाईनचा पोल अज्ञात इसम कापून नुकसान करून ठेवलेला दिसले. याबाबत ..../२

## लाचलुचपत विभागाची धाड ; आरेच्या अधिकाऱ्याच्या घरात सापडले कोटींचे घबाड

**दै.रायगड नगरी । मुंबई**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दाखल गुन्हयातील तपासाच्या अनुषंगाने यातील आरेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नथु राठोड यांच्या राहत्या घराची झडती घेतली असता घरात ३ कोटी ४६ लाख १० हजार इतकी बेहिशोबी रोकड आढळून आली. ही रक्कम जप्त करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.

तक्रारदार यांचे आरे कॉलनी, गोरेगाव पूर्व, मुंबई येथे घर असून सदर घराची दुरूस्तीकरीता परवानगी मिळण्यासाठी नथु राठोड, मुख्य कार्यकारी अधिकारी (आरे) दुग्ध वसाहत, गोरेगाव पूर्व, मुंबई तथा उप आयुक्त प्रशासन (अतिरिक्त कार्यभार), वरळी दुग्ध डेअरी ) यांची भेट घेतली असता त्यांनी आरेचा शिपाई अरविंद तिवारी याची भेट घेण्यास सांगितले. तक्रारदार यांनी अरविंद तिवारी यांची भेट घेतली असता त्यांनी नथु राठोड याचे वतीने तक्रादाराकडे या कामाकरीता ५० हजार इतक्या लाचेची रक्कम मागणी केली. फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी १४ मे रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई या कार्यालयात प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार दिली. ..../२

# कायदा गतीचा पाळा!

करोना संसर्गाची दुसरी लाट किंचित माघारत आहे. मुंबई, दिल्लीसहित अनेक महानगरे आणि राज्ये नवरुग्णांचे उतरते आकडे नोंदवत आहेत. प्राणवायू किंवा जीवरक्षक समजल्या जाणाऱ्या इंजेक्शनचा पुरवठाही काहीसा सुरळीत होताना दिसतो आहे; मात्र हा करोनाविजय नाही, याची आठवण याच वळणावर करून देण्याची नितांत आवश्यकता आहे. करोना हाताळताना भारताने काही गंभीर चुका केल्या आहेत. त्यातली पहिली म्हणजे, पहिल्या लाटेनंतर आलेला काहीसा सुस्तपणा. दुसरी म्हणजे, भारताची लोकसंख्या प्रचंड लोकसंख्या लक्षात घेऊन लसपुरवठ्याबाबत जी दक्षता घ्यायला हवी होती, ती घेण्यात झालेल्या घोडचुका. (याचे सविस्तर विवेचन शेजारी प्रकाशित केलेल्या लेखात आहे.) तिसरी चूक म्हणजे, पहिल्या लाटेत साऱ्या राज्यांनी ज्या प्रचंड; पण तात्पुरत्या सोयी उभ्या केल्या होत्या, त्या गुंडाळण्याची झालेली घाई. महाराष्ट्रातील ही घाई डोळ्यांत भरणारी होती. चौथी मोठी चूक म्हणजे, देशभरातील वैद्यकीय; तसेच परिचर्येचे शिक्षण घेणाऱ्या काही लाख विद्यार्थ्यांना करोना लढ्यात सामावून घेण्यात झालेली कुचराई. डॉ. देवी शेट्टी किंवा इतरही तज्ज्ञ ही सूचना वारंवार करीत असूनही यावर ठोस निर्णय अजून झालेले नाहीत. निदान, राज्यांनी तरी हे निर्णय आपल्या पातळीवर घेऊन राबवावेत. सुदैवाने, पहिल्या लाटेनंतरची ढिलाई सध्या नाही; त्यामुळेच तिसरी संभाव्य लाट लहान मुलांना लक्ष्य करणार असल्याची जाणीव सरकार, डॉक्टर व समाजात आज तरी दिसते आहे. करोनाच्या साथीने काळी बुरशी, पांढरी बुरशी आणि आता पिवळी बुरशी अशा तीन प्रकारच्या गंभीर 'फंगल इन्फेक्शन्स'नी आक्रमण केले आहे. पिवळ्या बुरशीचा पहिला रुग्ण गाझियाबादमध्ये सापडला असून, ती इतर दोनपेक्षा अधिक गंभीर आहे, असा इशारा डॉक्टर देत आहेत. करोना काळात प्रतिकारशक्ती कमी होणे, इतर सहव्याधी असणे आणि करोनावरचे उपचार चालू असताना व नंतर आसपास स्वच्छता नसणे, ही या 'म्युकरमायकोसिस'ची कारणे आहेत. करोना बरा झाल्यानंतरही हा बुरशीचा हल्ला होऊ शकतो. तिसऱ्या लाटेत ही सारी आव्हाने पेलायची आहेत. त्यातच पावसाळा तोंडावर आहे. पावसाळी विकार नेहमीप्रमाणे येतीलच. अशा वेळी, मुलांना एन्फ्लूएंझापासून वाचवणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राच्या वैद्यकीय कार्यगटाने सरकारला 'मुलांना तातडीने एन्फ्लूएंझा म्हणजे फ्लूची लस द्या' अशी सूचना केली आहे. सरकारने वेळ न दवडता तिची अंमलबजावणी करावी. मुलांना फ्लू झाला नाही, तर त्यांची फुफ्फुसांची क्षमता चांगली राहील आणि करोनाच्या संभाव्य आक्रमणाला तोंड देऊ शकणारी प्रतिकारशक्ती सज्ज राहील, ही यामागची भूमिका आहे. लसीकरणाला वेग येत असल्याने तिसरी लाट 'तितकी प्रभावी' नसेल, अशा आशादायी बातम्याही येत आहेत; मात्र त्यांच्यावर विसंबण्यात काही अर्थ नाही. दुहेरी लसीकरण झाल्यावरही करोनाचा संसर्ग झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. तेव्हा, तिसरी लाट येणार आणि ती लहान मुलांना त्रासदायक ठरणार, हे गृहित धरून केंद्राने व राज्याने आजच तयारीला लागण्याची गरज आहे. केवळ प्रदीर्घ बैठका घेणे, ऑनलाइन चर्चा करत राहणे किंवा पडद्यावर येऊन घरगुती गप्पा मारणे किंबहुना अश्रू ढाळणे, यांनी काहीही होणार नाही. महाराष्ट्रात आज राज्य सरकारचे १९ ते २० लाख कर्मचारी आहेत. त्यांना नेहमीची कामे आहेत; मात्र करोनामुळे तुलनेने कमी काम असणाऱ्या काही लाख कर्मचाऱ्यांना सरकारने करोना काळात नेमक्या कोणत्या जबाबदाऱ्या दिल्या आहेत? 'तिसऱ्या लाटेचा सामना करण्यासाठी सज्ज राहा. सुटकेचा नि:श्वास टाकू नका,' असे नागपूर खंडपीठाने नुकतेच नागपूर महापालिकेला खडसावले आहे. न्यायालयांच्या मुखातून उमटणारी ही समाजाची भावना सर्व स्थानिक स्वराज्य संस्था आणि राज्य सरकारने लक्षात घ्यायला हवी. अलीकडे, महाराष्ट्राचे आरोग्यमंत्रीही काही तरी उत्तरे देऊन प्रश्न उडवून लावायला लागले आहेत. औषधे, प्राणवायू, लहान मुलांच्या रुग्णशय्या, त्यांचे संभाव्य लसीकरण यांबाबतचा प्रत्येक तपशील नागरिकांना कळायलाच हवा. उपमुख्यमंत्र्यांनी पुणे जिल्ह्यातील बालरुग्णशय्या व इतर तयारीचा नुकताच आढावा घेतला. अनेक आदेश दिले. हे त्यांनी त्याच तडफेने साऱ्या राज्यासाठी करण्याची गरज आहे. औषधांचा काळा बाजार, महाग रुग्णवाहिका, रुग्णालयांतील खर्चिक सेवा या साऱ्यांत नागरिकांची जी काही लूटमार चालू आहे, त्यावर सरकार काही करतानाही दिसत नाही. करोना हे आले आणि गेले, असे संकट नाही. आपण किती कुचकामी, भ्रष्ट आणि बेजबाबदार व्यवस्था व यंत्रणा उभ्या केल्या आहेत, हे हजारो नागरिकांचे प्राण हिरावून करोनाने शाबीत केले आहे. आता आरोग्य आणि इतरही व्यवस्था कायमस्वरूपी कशा बदलता, सुधारता आणि उत्तरदायी बनवता येतील, याचा विचार तिसऱ्या लाटेच्या निमित्ताने करायला हवा. 'कायदा गतीचा पाळा, थांबला तो संपला' हे आजही खरे आहे आणि आपण करोनामुक्त होऊ, तेव्हाही खरेच असणार आहे.

# सहाय्यक पोलीस निरीक्षक संभाजी गुरव यांनी माऊंट एव्हरेस्ट शिखर केले सर

## नवी मुंबई पोलीस दलातून गुरव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई पोलिस दलात कार्यरत असलेले सहाय्यक पोलिस निरीक्षक संभाजी गुरव यांनी जगातील सर्वोच्च माऊंट एव्हरेस्ट शिखर सर करुन महाराष्ट्र पोलिस दलाचा झेंडा फडकावला आहे. एव्हरेस्ट सर करणारे संभाजी गुरव हे महाराष्ट्र पोलिस दलातील तिसरे अधिकारी आहेत. गुरव यांनी केलेल्या या कामगीरीमुळे त्यांच्यावर नवी मुंबई पोलीस दलातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह व सह पोलीस आयुक्त डॉ.जय जाधव व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देखील गुरव यांचे विशेष कौतुक केले आहे.



गुरव यांना प्रथमपासूनच गिर्यारोहणाची आवड होती. ती त्यांनी पोलिस दलात भरती झाल्यानंतरही जोपासली. त्यांनी एव्हरेस्ट बेसकॅम्पची मोहीम पुर्ण केली होती. नंतर गेली दोन वर्षे सराव करुन अखेर एव्हरेस्ट शिखर सर केले. उणे १९ अंश सेल्सिअसपर्यंत तापमान असलेल्या एव्हरेस्ट शिखरावर चढाई करताना गुरव यांनी काठमांडू येथून सुरुवात केली. एव्हरेस्ट बेस कॅम्पचा ६५ किलोमीटरचा टप्पा त्यांनी पुर्ण करत १७ मे रोजी कॅम्प-२ पर्यंत, १८ मे रोजी कॅम्प -३, १९ मे रोजी कॅम्प५४ आणि २० मे रोजी कॅम्प-४ ते एव्हरेस्ट शिखर अशी चढाई सुरु केली. वातावरणाने साथ दिल्याने रविवारी २३ मे रोजी त्यांनी एव्हरेस्ट शिखर सर केले. यापूर्वी महाराष्ट्र पोलिस दलातील आयपीएस सुहेल शर्मा, औरंगाबाद येथील पोलिस कर्मचारी रफीक शेख यांनी देखील एव्हरेस्ट सर करण्याची कामगिरी केली आहे. संभाजी गुरव यांनी यापूर्वी गडचिरोली येथे पोलिस दलात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. व्यायाम आणि शारिरिक क्षमता राखण्यावर त्यांनी कायम भर दिला. एक दिवस जगातील सर्वोच्च एव्हरेस्ट शिखर सर करायचे ही त्यांची इच्छा होती. अनंत अडचणींचा सामना करत त्यांनी एव्हरेस्ट शिखर सर करुन एव्हरेस्टवीर हा मानाचा किताब पटकावल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

२०१० मध्ये पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक म्हणून दाखल झाल्यानंतर संभाजी गुरुव यांनी सुरुवातीची तीन वर्षे गडचिरोलीतील नक्षली भागात कमांडो-६० या फोर्समध्ये काम केले आहे. या फोर्समध्ये कार्यरत असताना नक्षली प्रमाणे डोंगरदऱ्यात दुर्गम भागात रहाण्याची त्यांना सवय लागली. त्यानुसार शरीराची देखील क्षमता झाली. त्यानंतर डीवायएसपी असलेले भाऊ सुरज गुरव यांच्या सहकाऱ्यांसोबत सह्याद्रीच्या कुशीतील गड-किल्ले चढण्यांची त्यांना संधी मिळाली. त्यामुळे गिर्यारोहणाची आवड निर्माण झाल्याने संभाजी गुरव यांनी गिर्यारोहणाला सुरुवात केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक संभाजी गुरव यांनी या मोहीमेपुर्वी २०१७ मध्ये एव्हरेस्ट बेस कॅम्प (५३०० मीटर) व २०१८ मध्ये लडाख मधील स्टोक कांग्री शिखर (६१५० मीटर) व त्यानंतर त्यांनी २०१९ मध्ये नेपाळ मधील (२० हजार ३०० फुट) आयलंड पिक शिखर सर केले आहे.

# तळपत्या उन्हात पक्षी-प्राण्यांसाठी दाणा-पाण्याची व्यवस्था ; पर्यावरण स्नेही व प्राणी मित्रांची अनोखी भूतदया

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

मे च्या मध्यान्ह उन्हाच्या काहिलीने पक्षी-प्राण्यांच्या दाण्यापाण्याचे हाल होत आहेत. या पशुपक्षांच्या अन्नपाण्याची व्यवस्था करण्यासाठी जिल्ह्यातील अनेक प्राणीपक्षी मित्रांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी विविध ठिकाणी अन्नाची व पाण्याची व्यवस्था केली आहे.पर्यावरण स्नेही व प्राणी मित्रांनी अनोखे काम हाती घेतले आहे.



वाढता उष्म्यामुळे जंगल, माळरान आदी ठिकाणचे पाणवठे आटत चालले आहेत. तसेच वणवे आणि कडक उष्मा यामुळे वृक्षराजी नष्ट होत चालली आहे. त्यामुळे पशुपक्षांची अन्न पाण्याच्या शोधत वणवण होत आहे. काही वेळा अन्नपाण्याच्या शोधात अनेक प्राणी-पक्षी मृत पावत आहेत. त्यामुळेच त्यांचा जीव वाचावा आणि त्याची वणवण थांबावी यासाठी काही प्राणीपक्षी प्रेमी व संघटना पुढे आल्या आहेत. काहींनी आपल्या परसबागेत तर काहींनी जंगलात, रस्त्याच्या दुतर्फा पक्षी व प्राण्यांसाठी पाण्याची व खाद्याची व्यवस्था केली आहे. झाडांना प्लास्टिकच्या बाटल्या किंवा कॅन कापून अडकविल्या आहेत. त्यात पाणी आणि गहू, नाचणी, वरी असे खाद्य ठेवले जाते. तसेच जंगलात प्लास्टिकचे ड्रम कापून त्यामध्ये पाणी ठेवले जाते. तळा गावाजवळ एका रस्त्याच्या कडेला झाडाला कापलेले प्लास्टिकचे ड्रम अडकवून त्यात पाणी व दाणे ठेवले आहेत. तर नागोठणे रोहा मार्गावर भिसे खिंड रस्त्याच्या कडेला पाण्याने भरलेला प्लास्टिकचे ड्रम ठेवले आहेत. खिंडीत माकडांची संख्या अधिक असल्याने माकडांच्या तसेच इतर प्राणी पक्षांच्या पाण्याची व्यवस्था होते. यामार्गावरून जाणारे वाटसरू आपली गाडी थांबवून ड्रममध्ये आपल्याकडील पाणी भरतात असे ऍड विजयपाल सावंत यांनी सांगितले. नागोठणे विभागातील काही प्राणिप्रेमी आपला बहुतांश वेळ येथील माकड व पशुपक्षी यांच्या अन्न पाण्याची सोय करताना घालवतात. जिल्ह्यात ठिकठिकाणी झाडांवर पक्षांसाठी कॅन आणि प्लस्टिकच्या बाटल्यांमध्ये पाण्याची व्यवस्था केली आहे. अनेक पक्षी तेथे तृष्णा भागविण्यासाठी येतात. रमेश पवार यांनी देखील पशु पक्षांसाठी पाण्याची व्यवस्था केली आहे, त्यांनी सांगितले की समोरच्या जंगलातील भेकर सारखे प्राणी व पक्षी येथे पाणी पिण्यासाठी येतात. अशा स्वरूपाच्या उदात्त भावनेतून पशु पक्षी व प्राणी मात्रावर प्रेम केलं जातं आहे.

# सोमाटणे गावात जीवनावश्यक अन्नधान्याचे वाटप



**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल तालुक्यातील सोमाटणे गावातील गरजू नागरिकांना जीवनावश्यक अन्नधान्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी भाजपचे गुळसुंदे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, कसळखंड ग्रामपंचायतीचे माजी प्रभारी सरपंच अनिल पाटील, तानाजी पाटील, शिवाजी माळी, धनंजय पाटील, जयेंद्र मुंढे, दीपक पाटील, अतिश पोपटा, प्रणय दिघे, पंकज पाटील, आकाश कांबरी, पियूष, आदित्य, बबलू, अमर आदी उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## माणगांवात अनेकदा विज खंडीत होत असल्याने ग्राहकांचे नुकसान ग्राहक हैराण

वरुन तक्रार देणे दूरापास्त बाब झाली आहे. त्यांचा हा फोन कायम नॉट रिचेबल एंगेज लागतो. याची महावितरणने दखल घ्यावी.

विजबिलात आजवर कोणतीही सवलत वा माफी चक्रीवादळातील नुकसान म्हणुन ग्राहकांना मिळालेली नाही. अशातच अशा प्रकारे न दिसुन येणारे वीजखंडित झाल्याने होणारे नुकसान कोण भरुन देणार? असा सवाल ग्राहक विचारीत आहेत. लोकांमध्ये तिव्र नाराजी व संताप आहे. महावितरणच्या संबंधित अधिकारी तसेच राज्याचे उर्जामंत्री यांनी याची दखल घेऊन विज पुरवठा या दिवसात तरी स्थिर व सुरळीत होण्याचे कामी लक्ष वेधावे नुसतेच आधी बिल भरा मग तक्रार करा ! असे न होता सेवाही सुरळीत करा ! अशी येथील समस्त नागरिकांची मागणी आहे. अन्यथा भविष्यात वारंवार अशा प्रकारे होणारे नुकसान व त्रासामुळे शांतताभंग होण्याची दाट शक्यता ग्राहकांमधुन व्यक्त होत आहे.

## उरण पुर्व भाग दोन दिवसांपासून अंधारात

सर्वत्र दोष शोधण्यास सुरूवात केली मात्र संध्याकाळी त्यांना बीपीसीएल कंपनीच्या आवारातील खाडीच्या पाण्यात केबलमध्ये दोष असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर रात्रभर त्यांनी केबलमधील दोष दुरू करण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांना दोष दुरूस्त करता आला नाही. दुसऱ्या दिवशी देखिल दोष दुरूस्त करण्यात येत होता मात्र संध्याकाळ पर्यंत तरी हे काम झाले नव्हते. त्यामुळे मंगळवारी देखिल वीज पुर्ववत सुरू होण्याची शक्यता कमी होती. अगोदरच उन्हाळ्यामुळे अंगाची लाही लाही होत असताना घरातील पंखे सुद्धा चालत नसल्यामुळे नागरीकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

## महाड-पोलादपूर दरम्यान जुने-नवे स्टील चोरीच्या घटनांना ऊत

त्यांनी पोलादपूर पोलीस ठाण्यात जाऊन रितसर तक्रार नोंदविली असता अज्ञात व्यक्तीविरोधात अदखलपात्र गुन्हा भा.दं.संहिता १८६०च्या धारा २ च्या ४२७ नुसार नोंदविण्यात आला. याप्रकरणी पोलीस हवालदार मगर अधिक तपास करीत आहेत. मात्र, सोमवारी दुपारी सदर वीजेचा लोखंडी खांब हॅक्सो ब्लेडने कापताना अज्ञात इसमाचा व्हिडीओ महावितरणच्या उपकार्यकारी अभियंता सुद यांना प्राप्त झाला. यासंदर्भात, त्यांनी एस.टी.इलेक्ट्रीकल्स प्रा.लि.चे प्रोजेक्ट मॅनेजर गोपाळ अहिरराव यांना एस.टी. इलेक्ट्रीकल्स प्रा.लि.चा कामगार लोहारमाळ येथील एमएसइडीसीएलचा भंगारातील जुना लोखंडी विजेचा खांब कापत असल्याची माहिती ग्रामस्थांकडून प्राप्त झाली असून असा प्रकार पुन्हा घडल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी लेखी समज दिली होती. पोलादपूर तालुक्यातील रस्त्यालगतचे क्रॅश बॅरियर्स तसेच अन्य लोखंडीसामान गायब होण्याचा सर्रास प्रकार सुरू आहे. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील जुन्या रस्त्यालगतचे खांब काढून बाजूला ठेवून नवीन रस्त्यालगत विजेचे पर्यायी खांब उभारण्यात आले असताना त्या खांबांची वेळीच दिवील रस्त्यावरील तुर्भे सबस्टेशनच्या आवारात वाहतूक न झाल्याने चोरीला जाण्याचा प्रकार वाढला आहे. समुद्रातून लोटाभर पाणी कमी झाल्याने काही फरक पडत नाही या न्यायाने गेल्या काही महिन्यांपासून ट्रक्स, कंन्टेनर्समधून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरून वाहतूक होणाऱ्या स्टीलमधून काही स्टील परस्पर संगनमताने काढून बाजूला साठविणे, रस्त्यालगतचे जुने विजेचे खांब काही अंतरावर ठेऊन कालांतराने ते ट्रकबाहेर दिसणार नाहीत इतपत लांबीने कापून त्यांची वाहतूक करणे, दरीलगतचे क्रॅश बॅरियर्स दरीत ढकलून कालांतराने त्याची परस्पर वाहतूक करून विक्री करणे अथवा त्याच क्रॅश बॅरियर्सना चंदेरी रंग लावून ठेकेदाराला नवीन क्रॅश बॅरियर म्हणून विकणे आदी कामांमध्ये स्टील गायब करण्यामध्ये सक्रीय असलेल्या व्यावसायिकांना संबधित खात्यातील लोकांचेही छुपे सहकार्य मिळत आहे. पोलादपूर तालुक्यातील लोहारे येथील विजेचा जुना लोखंडी खांब कापण्यामागील आरोपी उपकार्यकारी अभियंत्यांच्या पत्रात एस.टी.इलेक्ट्रीकल्स प्रा.लि.चा कामगार असल्याचे नमूद करून पुन्हा असे घडल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा दिला असताना काही तासांतच महावितरणचे ज्ञानेश्वर माने यांनी नोंदविलेल्या एनसीमध्ये संबंधित कामगाराचा अज्ञात असा उल्लेख केलेला दिसून येत असल्याने या प्रकरणाचा सखोल तपास करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## आरेच्या अधिकाऱ्याच्या घरात सापडले कोटींचे घबाड

१९ मेला फिर्यादी यांना नथु राठोड यांच्या वरळी दुग्ध डेअरी येथील कार्यालयात भेटण्यास पाठवून तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता नथु राठोड यांनी फिर्यादी यांना पुन्हा अरविंद तिवारी यांची भेट घेण्यास सांगितले. त्यानुसार २४ मे रोजी फिर्यादी यांना राठोड यांच्या आरे दुग्ध डेअरी गोरेगाव कार्यालयात शिपाई अरविंद तिवारी यांची भेट घेण्यास पाठवून पडताळणी केली असता राठोड यांच्या वतीने तिवारीने ५० हजार इतक्या रक्कमेच्या लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले. त्यावरून करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान शिपाई अरविंद तिवारी यांनी फिर्यादी यांच्याकडून लाचेची रक्कम ५० हजार स्वीकारून फिर्यादी यांना नथु राठोड यांच्या समक्ष हजर करून त्याची सहमती घेतल्यावरून रंगेहाथ पकडण्यात आले. याबाबत कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात आली आहे.

# लायन्स क्लब पनवेल व पुज्य सिंधी पंचायत ट्रस्ट यांच्या माध्यमातून रक्तदान शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लायन्स क्लब पनवेल व पुज्य सिंधी पंचायत ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील सिंधी पंचायत हॉल येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ४५ रक्तदात्यांनी रक्तदान करून चांगला प्रतिसाद दिला.

सध्या सर्व ठिकाणी रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा जाणवत असल्यामुळे या शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे पनवेल लायन्स क्लबच्या अध्यक्षा भावना जेसवानी व पुज्य सिंधी पंचायत समितीचे ॲड.मनोहर सचदेव यांनी सांगितले. याप्रसंगी अध्यक्ष ला.भावना जेसवानी, सचिव ज्योती देशमाने, रिजन चेअरमन संजय गोडसे, संजय पोतदार, अशोक गिल्डा, राजेंद्र जेसवानी, नंदकिशोर धोत्रे, गौतम म्हस्के, सुरेश घाडगे, मुर्तुझा अफसर, शोभा गिल्डा, मिना पोतदार, स्वाती गोडसे, सुयोग पेंडसे, सुरभी पेंडसे, राजकुमार सचदेव, दौलत सचदेव आदी सभासद उपस्थित होते.

# जिल्हयातील रुग्णालयांनी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये नोंदणी करावी तर कोविड रुग्णांनी उपचारासाठी या योजनेचा लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

म्युकरमायकोसीस या आजाराने बाधीत रुग्णांना रुग्णालयामध्ये उपचार घेण्यासाठी आर्थिक बोजा पडू नये व सर्वच नागरिकांना आरोग्य विषयक हमी व आर्थिक दिलासा मिळावा, यासाठी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या अंगीकृत रुग्णालयामध्ये उपचार करण्यात येणार आहेत. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या अंगीकृत रुग्णालयामध्ये रायगड जिल्ह्यातील १) एमजीएम हॉस्पिटल कामोठे, २) लाईफ लाईन हॉस्पिटल पनवेल, ३) जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग या तीन रुग्णालयांची निश्चिती करण्यात आलेली आहे.

कोविड-१९ च्या काही रुग्णांमध्ये म्युकरमायकोसिसची लक्षणे आढळून येत आहेत. हा एक बुरशीजन्य आजार आहे. या आजारावरील उपचारासाठी बहुआयामी विशेषज्ञ सेवांची गरज भासते. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनमध्ये Rhinocerebral Mucormycosis for 10 Days Stay हे पॅकेज उपलब्ध आहे. याप्रमाणेच वैद्यकीय व शस्त्रक्रिया उपचारांशी संबंधित इतर पॅकेजेस सुद्धा उपलब्ध आहेत. तथापि सध्या राज्यामध्ये लागण झालेल्या म्युकरमायकोसीस या आजाराची तीव्रता लक्षात घेता याकरीता बहुआयामी विशेषज्ञ सेवांची गरज असून याकरीता येणारा खर्चही जास्त आहे. यामुळे खाजगी रुग्णालयातील उपचारावरील खर्चामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक भार सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर म्युकरमायकोसीस या आजाराने बाधीत रुग्णांना रुग्णालयामध्ये उपचार घेण्यासाठी आर्थिक बोजा पडू नये, आरोग्य विषयक हमी व आर्थिक दिलासा यासाठी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या अंगीकृत रुग्णालयामध्ये उपचार मिळावेत यासाठी दि. १८ मे, २०२१ रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत ११ सर्जीकल पॅकेज व ८ मेडीकल पॅकेज उपलब्ध करुन दिले आहेत. या दोन्हीही योजनांतर्गत रु.१.५० लक्ष पर्यत विमा संरक्षण आहे. त्यापुढे हमी तत्वावर रु.५.०० लक्ष पर्यंत संरक्षण आहे. तसेच म्युकरमायकोसीस या आजारापूर्वी बाधित व्यक्तीवर वा त्याच्या कुटुंबातील व्यक्तीवर उपलब्ध विमा संरक्षणापैकी काही रक्कम खर्च झालेली असू शकते. या दोन्ही योजनांतर्गत अनुज्ञेय विमा संरक्षणापेक्षा अधिक खर्च आल्यास अधिकचा खर्च राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून हमी तत्वावर भागविण्यात येणार आहे. तसेच रायगड जिल्हयातील इतर १९ रुग्णालयांमध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांतर्गत पात्र नागरिकांवर उपचार करण्यात येत आहेत.

### महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत जिल्ह्यातील समाविष्ट रुग्णालये

१) एमजीएम हॉस्पिटल कळंबोली, २) उन्नती हॉस्पिटल पनवेल, ३) आर. एस. एस. जनकल्याण पटवर्धन हॉस्पिटल पनवेल, ४) बिर्मोले हॉस्पिटल पनवेल, ५) पनवेल हॉस्पिटल, पनवेल, ६) अलिबाग डायलेसिस सेंटर अलिबाग, ७) लायन हेल्थ फाउंडेशन अलिबाग, ८) श्री साई मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल ट्रामा केअर सेंटर खारघर, पनवेल, ९) डॉ.जी.डी पोळ फाउंडेशन, वायएमटी जनरल हॉस्पिटल पनवेल, १०) संजीवनी आरोग्य संस्था मुरुड, ११) श्री सत्य साई संजीवनी हॉस्पिटल खारघर पनवेल, १२) एसीटीआरईसी हॉस्पिटल पनवेल, १३) उपजिल्हा रुग्णालय माणगाव, १४) उपजिल्हा रुग्णालय, महाड व ट्रामा केअर सेंटर महाड, १५ ) उपजिल्हा रुग्णालय पनवेल, १६) उपजिल्हा रुग्णालय कर्जत, १७ ) उपजिल्हा रुग्णालय पेण, १८) उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन, १९) उपजिल्हा रुग्णालय रोहा इ. ९९ रुग्णालयांचा समावेश आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## खालापूर तालुक्यातील नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी धारणी येथील जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

खालापूर तालुक्यातील नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, आसरे इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्वभूमीवर मौजे धारणी ता.खालापूर येथील स.नं.१५/० क्षेत्र ३.४९.०० हे.आर.पैकी ०-०५-० हे.आर. या जमिनीचे शासनाकडे पुर्नग्रहण करुन जमीन भोगाधिकार मूल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने मौजे धारणी ता.खालापूर येथील जागा नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र आसरे करिता पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत.

## नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, वासांबे करिता मौजे वासांबे येथील जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

खालापूर तालुक्यातील नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, वासांबे इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्वभूमीवर मौजे वासांबे ता.खालापूर येथील स.नं.५२/१अ/१ क्षेत्र ४.०९.७६ हे.आर.पैकी ०-०५-० हे.आर. या जमीनीचे शासनाकडे पुर्नग्रहण करुन जमीन भोगाधिकार मूल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने मौजे वासांबे ता.खालापूर येथील जागा नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र,वासांबे करिता पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत.

## दापिवली येथे लसीकरण केंद्र

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील दापिवली येथे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण केंद्र कार्यान्वित झाले आहे.

कोरोना वैश्विक महामारीचा संसर्ग पाहता लसीकरण केंद्र वाढविण्याची गरज वाढली असल्याने आमदार महेश बालदी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे रसायनी परिसरातील दापिवली येथे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण केंद्राची मागणी केली होती.

त्यांच्या मागणीनुसार हे लसीकरण केंद्र सुरु झाले. त्यामुळे रसायनी परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# जेएनपीटीची एक कोटी खर्चून ऑक्सिजन जनरेशन प्लांट उभारण्याची तयारी

## जेएनपीटी, उरण आणि इतर परिसरातील हॉस्पिटल रुग्णांना दिलासा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण : देशभरात ऑक्सिजनच्या तुटवड्यामुळे कोरोना रुग्णांच्या मृत्युच्या वाढत्या घटना पाहता जेएनपीटीने स्वताचा प्रती मिनिट ३५० लिटर्स निर्मिती क्षमतेचा ऑक्सिजन जनरेशन प्लाण्ट उभारण्याची तयारी सुरु केली आहे. सुमारे एक कोटी खर्चाच्या आणि जेएनपीटीच्या मालकीच्या १०० स्क्वेअर मिटर क्षेत्रात उभारण्यात येणाऱ्या ऑक्सिजन जनरेशन प्लाण्टमुळे जेएनपीटी, उरण परिसरातील हॉस्पिटलसाठीच नव्हे तर आजुबाजुच्या परिसरातील इतर कोरोना हॉस्पिटल मधील दुसऱ्या-तिसऱ्या कोरोना लाटेत सापडणाऱ्या हजारो रुग्णांना मोठा फायदा होणार आहे.



उरण परिसरातील कोरोनाग्रस्त रुग्णांसाठी उरण व जेएनपीटी येथील दोनच कोवीड हेल्थकेअर सेंटर आहेत.या दोन्ही मिळून सेंटरची रुग्ण क्षमता १२० -१२५ पर्यंत आहे. कोरोनाच्या पहिल्या, दुसऱ्या स्टेजमधील रुग्णांवर उपचार केले जातात.या दोन्ही सेंटरमध्ये प्राणवायूची लेवल कमी झालेल्या रुग्णांना ऑक्सिजनची गरज मोठ्या प्रमाणावर भासते. कोरोनाच्या पहिल्या लाटेपेक्षा दुसऱ्या लाटेत प्राणवायूची लेवल कमी झालेल्या बाधीत रुग्णांची आणि ऑक्सिजन अभावी मृत्युमुखी पडलेल्या रुग्णांची संख्याही सर्वाधिक आहे.

देशभरात तर वेळेत ऑक्सिजन उपलब्ध न झाल्याने दुदैवाने विविध रुग्णालयात शेकडो रुग्णांना आपले प्राण गमवावे लागले आहे. त्यामुळे कोरानाच्या तिसऱ्या लाटेचा सामना करण्यासाठी उरण, जेएनपीटी कोवीड सेंटरमध्ये रुग्णांच्या उपचारासाठी ऑक्सिजनची गरज पुर्ण करण्यासाठी खबरदारीची उपाययोजना म्हणूनच केंद्राच्या सुचनेनुसार जेएनपीटीमध्येच ऑक्सिजन जनरेशन प्लँट उभारण्याची तयारी सुरू केली असल्याची माहिती जेएनपीटीचे मुख्य वरिष्ठ प्रबंधक तथा सेक्रेटरी जयंत ढवळे यांनी दिली आहे.

सप्लाय, इंन्स्टालेशन, टेस्टींग, कमर्शिंगच्या कामासह मेडिकल ग्रेड ऑक्सिजन निर्मितीसाठी ऑक्सिजन जनरेशन प्लाण्ट उभारण्यात येणार आहे. निविदानंतर ऑक्सिजनची पुरवठ्याची वाढती मागणीची गरज लक्षात घेऊन हा प्लांट ७० दिवसांच्या मुदतीत उभारण्यात येणार आहे.

> देशभरात कोरोना दरम्यान ऑक्सिजन अभावी रुग्णांच्या संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. वाढत्या मृतांच्या संख्येमुळे अत्यंत संवेदनशील बनलेल्या घटनेची दखल घेऊन केंद्र सरकारच्या शिपिंग मंत्रालयानेही जेएनपीटीने ऑक्सिजन जनरेशन प्लांट उभारण्याची सुचना केली आहे. त्यानंतर जेएनपीटीने १०० स्क्वेअर मीटर जागेत ऑक्सिजन जनरेशन प्लांट उभारण्याची तयारी सुरू केली आहे. या ऑक्सिजन जनरेशन प्लांटमधुन प्रति मिनिटाला ३५० लिटर्स ऑक्सिजनची निर्मिती केली जाणार आहे.यासाठी सुमारे एक कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यासाठी ११ मे रोजी निविदाही मागविण्यात आल्या आहेत.
>
> **नितीन बोरवणकर, मुख्य प्रबंधक जेएनपीटी**

# मनसेतर्फे कळंबोली कोव्हीड सेंटरच्या डॉक्टरांना मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अमित ठाकरे यांच्या वाढ दिवसाचे औचित्य साधून मनसे तर्फे डॉक्टरांना वैद्यकिय सामानाचा साठा ठेवण्याकरीता मोफत कपाटे देण्यात आली.

कोव्हीड काळात डॉक्टरांना अहोरात्र काम करावे लागत आहे याची सर्वांना जाणीव आहे असे भावनिक उद्गार नविन पनवेल शहर अध्यक्ष पराग बालड यांनी यावेळी बोलताना काढले. तसेच काही हॉस्पीटलची वाढीव बिले मनसैनिकांचे हॉस्पीटल प्रशासनाला फोन जाताच ज्या हॉस्पिटलने जी पेशन्टची बिले कमी करून सहकार्य केले व मेडीसिन मध्येही १०% कपात करून गोरगरीबांना आधार कोवीड काळात दिला त्या बद्दल हॉस्पीटल प्रशासनाचे आभारही पराग बालड व्यक्त केले याचीच जाण ठेवुन अमित ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा छोटेखानी कार्यक्रम केला असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉक्टरांना वैद्यकिय सामान ठेवण्याकरीता मनसे कडुन कपाटे देण्यात आली. मनसे तालुका अध्यक्ष अविनाश पडवळ, तसेच जिल्हा सचिव केसरीनाथ पाटील उपजिल्हा अध्यक्ष अतुल चव्हाण यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कळंबोली शहर अध्यक्ष अमोल बोचरे, जेष्ठ मनसे सैनिक संजय मुरकुटे, अवधुत ठाकुर, संचित मोरे, आकाश दलाल, अक्षय जोशी, सिध्देश खानविलकर व डॉक्टर अक्षय कोळेकर आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना

# उरणच्या शेतकऱ्याच्या मुलाने शेतीसाठी उपयुक्त बनविलेला प्रकल्प महाराष्ट्रात पहिला

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**



उरण तालुक्यातील एका शेतकऱ्याच्या मुलाने शेतीला पुरक आणि फायदेशीर असे रेडिओ फ्रिक्वेन्सी वॉटर लेवल कंट्रोलर असे उपकरण बनवून त्याचा प्रोजेक्ट गव्हर्मेंट पॉलिटेक्निकल कराड ने आयोजित केलेल्या एका सी-कोडींग, टेक्निकल क्वीझ, इनोव्हेशन आयडीया स्पर्धेत पाठवला होता. राज्य स्तरीय असलेल्या या स्पर्धेत उरण चिरनेर येथिल करण एकनाथ रेवसकर याचा रेडिओ फ्रिक्वेन्सी वॉटर लेवल कंट्रोलर हा प्रकल्प पहिल्या क्रमांकाचा ठरला. करणच्या या कामगिरीने त्याचे तालुक्यात अभिनंदन करण्यात येत आहे.

करण रेवसकरने बनविलेला हा प्रोजेक्ट शेतकऱ्यांसाठी फायद्याचा आहे. या प्रकल्पामुळे शेतकऱ्याला घरबसल्या पाण्याचे नियोजन करता येणार आहे. त्यामुळे पाणी वाया जाणार नाही, मनुष्य बळाची गरज लागणार नाही शिवाय वीजेची देखिल बचत होणार आहे. २० मे २०२१ रोजी ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत करण एकनाथ रेवसकर याच्या प्रोजेक्टला पहिला क्रमांक, अथाश्री अभिलाश पाटील रा. कराड हिला द्वितीय क्रमांक तर शिवानी कमलाकर व्यवहारे रा. नाशिक याला तिसरा क्रमाक मिळाला. करण रेवसकर हा भारती विद्यापिठ इन्स्टीट्यूट ऑफ टेकनॉलॉजी, नवी मुंबई येथे शिक्षण घेत आहे. त्याच्या यशाचे सर्वत्र कौतूक होत आहे.

# आंबिवली येथे लसीकरण केंद्राचे उदघाटन

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यायतील आंबिवली येथे लसीकरण केंद्राचे उद्घाटन आंबिवली सरपंच नेहा प्रशांत पाटील व माजी सरपंच देविदास नारायण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

आंबिवली गावामध्ये लसीकरण केंद्र सुरू झाल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. कारण या अगोदर आंबिवली गावातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य केंद्र जिते, पेण उपजिल्हा रुग्णालयात लस घेण्यासाठी जावे लागत होते त्यामुळे नागरिकांना त्रास होत होता. आंबिवली येथे लसीकरण केंद्र सुरू झाल्याने नागरिकांनी सरपंच नेहा पाटील यांचे आभार मानून अभिनंदन केले.

या कार्यक्रम प्रसंगी सरपंच नेहा पाटील, माजी सरपंच देवीदास पाटील, प्रशांत पाटील यांच्यासह डॉ.प्रियंका जगदाले, आरोग्य सेविका एन.आर.पाटील आरोग्य सेवक डी. एन.घरत, आशा सेविका अश्विनी नाईक, विशाखा पाटील, शिल्पा पाटील व मदतनीस रेवती पाटील आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# देवा ग्रुप फाउंडेशन रोहा तर्फे मास्क व सॅनिटायझर वाटप

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

देवा ग्रुप फाउंडेशन हे विधायक, शैक्षणिक सामाजिक त्याचप्रमाणे अन्यायाविरुद्ध लढणारी रोहा येथील एक क्रियाशील संघटना आहे. या संघटने मार्फत आजतगायत कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनेक गरीब गरजूंनी विविध प्रकारच्या वस्तू, फळे देऊन सहकार्याचा हात पुढे केला आहे. या संघटनेचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख बॉबीशेठ वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली रोहा तालुका अध्यक्ष विकी रामाणे, उपाध्यक्ष समीर रटाटे यांच्या नेतृत्वाखाली रोहा, खारी, कोलाड या पोलिस ठाण्यातील पोलिस बांधवांना मास्क तसेच सॅनिटायझर चे वाटप करण्यात आले.

त्याचप्रमाणे रोहा शासकीय रुग्णालय, कोलाड आंबेवाडी प्राथमिक आरोग्य केंद्र, किल्ला कोविड सेंटर आदींना फळे व फळांचा ज्यूस देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सुजित ढोले,त्याचप्रमाणे तानाजी मोरे, अविनाश फोडसे, मॅक्स फोडसे,छोट्या पाटील, बॉबी वाघमारे तसेच रायगड जिल्हा संपर्कप्रमुख या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली देवा ग्रुप फाउंडेशन च्या पदाधिकारी, सदस्य यांच्या उपस्थितीत फळे व ज्यूस वाटप करण्यात आले.

# विक्रांत पाटील यांच्यातर्फे गरजू रिक्षा चालकांना जीवनावश्यक वास्तूंचे वाटप करण्यात आले



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना काळात लॉक डाऊनमुळे सामान्य लोकांचे आर्थिक गणित बिघडत चालले आहे त्यात रोज कमाई करून खाणाऱ्या लोकांचे आणि रिक्षा चालकांची तर परिस्थिती आणखीन बिकट आहे.या परिस्थितीचा गांभिर्याने विचार करत नगरसेवक विक्रांत पाटील आणि कोठारी फाऊंडेशन यांच्या वतीने प्रभाग क्र १८ मधील गरजू रिक्षा चालकांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या जनसेवा कार्यालय जवळ करण्यात आले.

महाराष्ट्र सरकार ने घोषणा करूनही रिक्षा चालकांना कोणतीही मदत अद्यापही मिळाली नाही पण नगरसेवक विक्रांत पाटील यांनी योग्यवेळी मदत केल्याबद्दल जमलेल्या सर्व रिक्षा चालकांनी आभार मानले. माझ्या प्रभागाच्या समस्या सोडवण्यासाठी मी नेहमीच तत्पर असतो पण सध्या लॉक डाऊनमुळे रिक्षा चालकांना धंदा ही मंदावला आहे काही लोक घरी बसले आहेत अशा माझ्या प्रभागातील रिक्षा चालकांना मदत करणे हे माझे परम कर्तव्य समझतो तसेच यापुढेही हे समाजकार्य असेच पुढे चालू राहील असे मनोगत नगरसेवक विक्रांत पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी भाजयुमो प्रिंट मीडिया सेल आणि कोठारी फाऊंडेशनचे विमलकुमार जैन, निलेश नाईक, निलेश देशमुख आणि इतर मान्यवर उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : धामणी, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी त्यांचे मालकाकडून/कब्जेदाराकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : धामणी, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालकाचे/ कब्जेदाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | भूधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| श्री.संजय यशवंत कांडपिळे सौ.अनिता संजय कांडपिळे | ३ | १/अ | भोगवटादार वर्ग-१ | ६-१०-० पो.ख.१-७४-९० एकूण ७-८४-९० एकूण क्षेत्रापैकी २० गुंठे जागा | ८.९६ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसा हक्क, लिज, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदलाबदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधची व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसात कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यास येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही हरकत घेतल्यास ती हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २५/०५/२०२१

सही/-
अॅड.सतीश स.फडके
बी-२, धवलगिरी को.ऑप.हौ.सो.लि.,
प्लॉट नं.१०४, पिसपार्क हॉटेलजवळ,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
मो.नं.८८९८२१७५५५



## ग्रुप ग्रामपंचायत चिखले
### ता.पनवेल, जि.रायगड
### निवीदा सूचना सन-२०२१/२०२२

दि.२५/०५/२०२१

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत चिखले हद्दीतील खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.२७/०५/२०२१ ते ०४/०६/२०२१ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.०४/०६/२०२१ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ४ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रुप ग्रामपंचायत चिखले यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | सुरक्षा अनामत ५% | ठेकेदारा वर्ग | निविदा किंमत | निविदा पाठविण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अतुल पाटणकर यांच्या घरापासून ते गोविंद पाटणकर यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे (ग्रामनिधी) | २,०१,४७३.०० | २०१५.०० | १००७४.०० | - | १००.०० | ०४/०६/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत |
| २ | विजया सदन सोसायटी चिखले येथील रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे (ग्रामनिधी) | २,१७,३००.०० | २१७३.०० | १०८६५.०० | - | १००.०० | |
| ३ | चिखले येथील योगेश पाटील घरापासून ते गजानन भोईर यांच्या घरापर्यंत बंदिस्त नाला काढून रस्ता काँक्रीटीकरण करणे (ग्रामनिधी) | २,९९,१८१.०० | २९९२.०० | १४९५९.०० | - | १००.०० | |
| ४ | ग्रामपंचायत चिखले येथे धर्मा शिर्के यांच्या घरापासून ते शांताराम पंडित यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे (पं.स.सेस निधी) | २,९०,०००.०० | २९००.०० | १४५००.०० | - | १००.०० | |
| ५ | ग्रामपंचायत चिखले अंतर्गत सांगडे गावात श्री.अनिल बाळाराम भोपी ते हनुमान मंदिर पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे (पं.स.सेस १५ वा वित्त आयोग संबंधित निधी) | २,५०,०००.०० | २५००.०० | १२५००.०० | - | १००.०० | |
| ६ | रा.जि.प. शाळा चिखले ते हनुमान मंदिर पर्यंत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. (१५ वा वित्त आयोग ग्रा.पं.स्तर) | २,४०,००.०० | २४००.०० | १२०००.०० | - | १००.०० | |

**अटी व शर्ती :-**

१. सदरचे काम ग्रामपंचायतीने दिलेल्या मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक आहे.तसे न झाल्यास दंडात्मक कारवाई करणेत येईल.
२. सदर कामाच्या निविदा परसेंटेज दराने भरावयाचे आहेत व तेच दर निविदेसाठी कायमस्वरूपी ग्राह्य धरले जातील. सदर कामांचे निविदा अर्ज वरील कालावधीत कार्यालयीन वेळेत १००/- प्रति निविदा अर्ज दराने उपलब्ध आहेत. ग्रामपंचायतीच्या निविदा अर्जा व्यतिरीक्त अर्ज स्विकारला जाणार नाही. अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची निवीदा अस्विकृत राहील.
३. मागिलेल्या सर्व कागदपत्रांचे सादरीकरण करणे आवश्यक आहे.
४. पॅनकार्डची व आयकराची झेरॉक्स प्रत / प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
५. कमीत कमी निविदा दर सादर करणा-या ठेकेदारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.
६. सदर निविदा दर सन २०२१-२०२२ करीता मंजुर राहील.
७. सदर कामाचे अंदाजपत्रक ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
८. निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही. व दिलेली तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. निविदेची किंमत ना परतावा राहील.
९. अधिकृत ठेकेदाराने निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदाराचा विचार केला जाईल.
१०. कामाच्या बिलातून नियमाप्रमाणे, ५% सुरक्षा अनामत, २.३३ % आयकर, ,०.१५% आयकरावर सरचार्ज इ.रक्कम प्रत्येक बिलातून कापली जाईल. काम सुरू करण्यापूर्वी १% कामगार विमा सरकारी चलनाद्वारे भरणा करून सदर चलनाची प्रत ग्रामपंचायत मध्ये सादर करणे बंधनकारक आहे.
११. वर्क ऑर्डर प्रमाणे मुदतीत काम पुर्ण न झाल्यास दुस-या ठेकेदाराकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणा-या नुकसानीस /खर्चास तसेच कार्यवाहीस आपणांस स्वत:जबाबदार रहावे लागेल.
१२. तांत्रिक मुल्यांकनानुसार व निधी उपल्बधतेनुसार देयके अदा केली जातील.
१३. निविदा मंजूर झाल्यास कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासून ५ दिवसाचे आत सुरू करणेचे बंधनकारक राहील.
१४. मंजुर काम हे ठेकेदाराने पनवेल पंचायत समिती,बांधकाम विभाग यांचेकडील तांत्रिक अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायतीने देखरेखीखली करावयाचे आहे.
१५. सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील केलेल्या कामाचा दर्जा चांगला असल्याची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत पात केली जाईल.
१६. काम पुर्ण करणे पुर्वीचा व काम सुरू झाल्यानंतरचा कामाचा फोटो सादर केल्याशिवाय अंतीम बिले दिली जाणार नाही.सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करावयाचे आहे.
१७. बांधकाम पुर्ण झाल्यावर नियमाप्रमाणे कामाचे ठिकाणी ३३ चा कामाचा बोर्ड बसविणेत यावा. बोर्ड न लावल्यास अंतिम बिल मिळणार नाही. बोर्ड लावत असलेबाबतचा फोटो सादर करणे बंधन कारक आहे
१८. मंजुर काम अंदाजपत्रकाप्रमाणे करणेत यावे. कोणाचेही तोंडी सांगण्यावरून वाढीव काम केल्यास वाढीव रक्कम दिली जाणार नाही.
१९. एक किंवा सर्व निवीदा मंजूर / नामंजुर करणेचा अधिकार ग्रामपंचायत जांभिवली स्वत:कडे राखून ठेवत आहे. कृपया याची आपण नोंद घ्यावी.

सही/-
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत चिखले

सही/-
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत चिखले

# संक्षिप्त...

## मायावती यांच्याविरोधात आक्षेपार्ह ट्विट केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी मुख्यमंत्री मायावती यांच्या विरोधात आक्षेपार्ह ट्विट केल्याप्रकरणी दोघांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डॉक्टर मुंजाल व्ही. कपाडिया आणि आकाश मेहता यांनी ट्विटर अकाउंटवरून मायावती या अनुसूचित जातीच्या सदस्य असल्याचे त्यांना माहीत असतानाही त्यांचा सार्वजनिक अपमान, पाणउतारा, मानखंडना करण्यासाठी तसेच अनुसूचित जातीच्या सदस्याविरुद्ध तुच्छतेची व शत्रुत्वाची भावना निर्माण करून अपमान करण्यासाठी तसेच जनमानसात बाधा निर्माण होण्यासाठी आक्षेपार्ह ट्वीट केले म्हणून दोघां विरोधात ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दादर येथे विठ्ठल रखुमाई उत्सव साध्या पद्धतीने साजरा

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील दादर गावात विठ्ठल रखुमाईचा उत्सव गेल्या वर्षी प्रमाणे याहीवर्षी कोरोनाचे संकट असल्याने साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला. कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शासकीय नियमांचे पालन करण्यात आले. यावेळी विठ्ठल रखुमाईचा उत्सव मोजक्याच भाविक भक्तांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला असून कोणताही कार्यक्रम ठेवण्यात आला नाही. या कार्यक्रम प्रसंगी निकिता राकेश ठाकूर यांनी गेल्या वर्षी बोललेला नवस यावर्षी कु.आरव राकेश ठाकूर याची तुला फळा- फुलांनी करुन विठ्ठल रखुमाई मंदिरात पूर्ण केला. यावेळी विठ्ठल रखुमाई मंडळाचे सदस्य ह.भ.प. बाबुराव बाळाराम पाटील यांचे काही दिवसांपूर्वीच निधन झाल्याने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली

## नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, कोनसाठी मौजे शिरढोण येथील जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पनवेल तालुक्यातील नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र कोनच्या इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

या पार्श्वभूमीवर मौजे शिरढोण ता.पनवेल येथील स.नं.३१/० क्षेत्र ०.४८.०० हे.आर.पैकी ०-०५-० हे.आर. या जमिनीचे शासनाकडे पुर्नग्रहण करुन जमीन भोगाधिकार मूल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने मौजे शिरढोण ता.पनवेल येथील जागा नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र कोन करिता पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत.


# पनवेल सायन महामार्ग अंधारातच ; पथदिवे हस्तांतरणास पनवेल मनपाची टाळाटाळ

### रात्रीच्यावेळी महामार्गावर अंधाराचे जाळे ; सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासकीय आदेशाकडे बोट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबईकडे जाणाऱ्या पनवेल सायन महामार्गावरील पथदिवे बंद अवस्थेत आहेत. शासनाच्या आदेशानुसार हे पथदिवे स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून पनवेल महापालिकेने ते हस्तांतरित करून घ्यावेत याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सातत्याने पत्रव्यवहार केला जात आहे. परंतु याबाबत मनपा प्रशासनाकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने महामार्गावर अंधाराचे जाळे पसरले आहे. त्यामुळे वाहनचालक व प्रवाशांना गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे.

बांधा वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर पनवेल सायन महामार्गाचे पाच वर्षांपूर्वी रुंदीकरण आणि काँक्रिटीकरण करण्यात आले. कळंबोली ते बीआरसी जंक्शन यादरम्यान हा महामार्ग आहे. पनवेल टोल वेज कंपनीला हे काम देण्यात आले होते. बाराशे कोटी रुपये खर्च करून हा महामार्ग बांधण्यात आला. त्यावर पथदिव्यांची ही सोय करण्यात आली. त्यामुळे रात्रीच्या वेळी पनवेल सायन महामार्ग प्रकाशमय झाला. दरम्यान मध्यंतरीच्या काळामध्ये राज्य सरकारने लहान वाहनांना पथक करांमधून सूट दिली. त्यामध्ये खारघर टोलनाक्याचा ही समावेश आहे. या बदल्यात होणारे नुकसान भरपाई राज्य सरकारने देणे अपेक्षित होते. परंतु ती रक्कम न मिळाल्याने संबंधित कंपनीने टोल वसुलीचे काम सोडून दिले. त्यानंतर इतर एजन्सी या ठिकाणी नियुक्त करण्यात आली. निधी अभावी महामार्गावरील पथदिवे त्याचबरोबर सिग्नल यंत्रणा देखभाल दुरूस्थ करून ती चालू ठेवणे सार्वजनिक बांधकाम विभागाला दुरापास्त झाले आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून पन-वेल सायन महामार्गावरील पथदिवे देखभाल व दुरुस्तीसाठी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात यावेत अशा प्रकारचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्यात आले. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नवी मुंबई बरोबरच पनवेल महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार करून हे पथदिवे वर्ग करण्याचे सूचित केले आहे. भारती विद्यापीठ ते कळंबोली जंक्शन यादरम्यान चे पथदिवे देखभाली करता पनवेल महापालिकेने हस्तांतरित करून घेण्याबाबत गेल्या वर्ष दीड वर्षापासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पत्रव्यवहार केला जात आहे. परंतु त्याला महापालिका प्रशासनाकडून प्रतिसाद मिळत नसल्याने पनवेल सायन महामार्गावरील पथदिवे बंद अवस्थेत आहेत. त्यामुळे रात्रीच्या वेळी याठिकाणी अंधार पसरत आहे. मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा बैठकीत पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील भारती विद्यापीठ ते कळंबोली जंक्शन यादरम्यान चे पनवेल सायन महामार्गावरील पथदिवे देखभाल व दुरुस्ती करीता विजेची देयके भरण्याच्या खर्चासह पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्या आदेशाची प्रत आणि स्मरण पत्र वारंवार पनवेल महानगरपालिकेला पाठवण्यात आले आहेत असे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सांगण्यात आले. पनवेल सायन महामार्गावर नागरिक वसाहतींच्या हद्दीमध्ये सिग्नल यंत्रणा बसविण्यात आली होती. पनवेल महापालिका क्षेत्राच्या जिथे जिथे सिग्नल बसविण्यात आले आहेत ते बंद अवस्थेत आहेत. त्यामुळे येथील वाहतूक नियमन करण्याकरता अनेक अडचणी येत आहेत. तसेच लहान-मोठे अपघात सुद्धा घडत आहेत.



## बापूजीदेव मंदिर चिरनेर येथे स्वच्छता मोहीम संपन्न



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील छावा प्रतीष्ठान चिरनेर तर्फे सोमवार दि.२४ मे रोजी बापूजीदेव मंदिर परीसरात स्वच्छता मोहीम राबवीण्यात आली.

चिरनेर मधील बापूजीदेव मंदिर हे निसर्गरम्य परीसरात डौलदारपणे उभे आसलेले मंदिर आहे. गावापासून दूर आसलेल्या या मंदिरा सभोवताली छोटे छोटे डोंगर उभे आहेत. या मंदिर परीसरात सुट्टीच्या दिवशी व अनेकदा बरेच लोक विरंगूळ्याच ठिकाण म्हणून येवून देव दर्शनासोबत सहभोजनाचा आनंद घेत असतात. त्यामुळे या परीसरात अस्वच्छताही तेवढीच पसरते.हि गोष्ट लक्षात घेवून छावा प्रतिष्ठान चिरनेरच्या सदस्यांनी जावून हा परीसर स्वच्छ केला. तिन तास मेहनत घेवून या परिसरात पसरलेल्या कागदी व प्लास्टीक डिश, पत्रावली, प्लास्टीक बाटल्या, काचेच्या बाटल्या, कुरकुरे यांची पाकीटे आसा अनेक प्रकारचा कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावली. यावेळी छावाप्रतिष्ठानचे सदस्य भारतीय तोफखान्यातील निवृत्त सैनिक सचिन कडू, उपाध्यक्ष सुशिल म्हात्रे, कार्याध्यक्ष संतोष भोईर, सहसचिव सचिन केणी, सचिव धिरज केणी, जेष्ठ सदस्य रमेश कडू , योगेश केणी आदिंनी सहभाग घेतला होता.

# वीकेंड लॉकडाऊनमध्ये व्यावसायिकांवर अन्याय व कुटूंबावर उपासमारीची वेळ

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता सर्वत्र लॉक डाऊन करण्यात आला.व शासनाकडून फक्त किराणा, दूध, चिकन, मटण, मच्छि, भाजी, या व्यवसायिकांना सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत तर आत्यावश्यक सेवेतील मेडिकल सेवा व दवाखाने पुर्ण वेळ सुरु ठेवण्याची परवानगी देण्यात आली तर कापड, पानटपरी, ज्वेलरी, व सलून या व्यवसायिकांवर पुर्ण वेळ बंदी आणुन त्यांच्यावर अन्याय केल्यामुळे या व्यवसायिकांवर उपासमारीची वेळ आली आहे.

सोशल डिस्टन्स पालन करीत अत्यावश्यक सेवेतील किराणा, दूध,भाजी, मटण, मच्छि या व्यवसायिकांना सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत दुकान सुरु ठेवण्याची मुभा देण्यात आली परंतु या दुकानात कोणतेही सोशल डिस्टन्सचा पालन केला गेला नाही याउलट या काळावधीत दुकानात व बाजारपेठेत प्रचंड गर्दी केली जात होती तर काही व्यवसायिक यांना घरपोच सेवा देण्यासाठी मुभा देण्यात आली. मग गर्दीचे निर्भन्द सांगून आमच्यावर अन्याय का असा सवाल पानटपरी, कापड, ज्वेलरी, व सलून व्यावसायिकांकडून केला जात आहे.

यानंतर सोमवार दि.१७ मे रोजी तौक्ते चक्रवादळामुळे सर्वत्र लोकांच्या घरांचे,



शेतीचे व फळ बागाचे प्रचंड नुकसान झाले यामुळे किराणा, हार्डवेअर, घर दुरुस्तीचे समान भाजी, मटण, मच्छी, व्यवसायिकांना सकाळी ७ ते संध्याकाळी ७ पर्यंत सुरु ठेवण्याची मुभा पुन्हा देण्यात आली तर मग आम्हांला अद्याप आमची दुकाने उघण्यास परवानगी का देण्यात येत नसल्याची खंत पानटपरी, कापड, ज्वेलरी, सलून व अद्याप सुरु न करण्यात आलेल्या व्यावसायिकांकडून केली जात आहे.

गेली पंधरा सोहळा महिने काही दुकानदारांची तेजी तर काहींची उपासमार त्यामुळे मानेवर कोरोना तर लॉकडाऊनमुले उपासमार दुकान गळ्यांचे भाडे लाईट बिल इतर खर्च त्यामुळे कापड व्यवसाय सलून पानटपरी यांचे भाडे दुकान उघडा अथवा न उघडा हे भरावे लागत आहे. त्यात विद्युत पुरवठा वीज वापरात येवो अथवा न येवो मात्र त्यांचे कर कमर्शल मीटर म्हणून अधिक त्याचे भाडे भरावे लागत आहे. त्यात व्यवसाय ठप्प झाल्याने अधिक चिंता कुटूंबाची लहान सहान दुकांदारांवर यामुळे उपास मारीची वेळ आली आहे. तरी स्थानिक प्रशासकीय अधिकारी वर्गानी याचा गांभीर्याने विचार करून सदरील व्यवसायिकांना यंत्रणेच्या अटी शर्तीची अमलबजावणी करत व्यवसाय सुरू करण्यासाठी परवानगी देण्यात यावी अशी मागणी व्यवसायिक करत आहेत.

## मानकीवली येथील धोकादायक मोरीच्या दुरुस्ती कामास सुरुवात

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील कडाव मानकीवली रस्त्यावरील मोरी जीर्ण होऊन धोकादायक स्थितीत होती. या मोरीची दुरुस्ती करावी यासाठी कडाव ग्रामपंचायत प्रशासन व स्थानिक कार्यकर्ते यांचे प्रयत्न सुरु केले होते. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन जिल्हा वार्षिक योजनेतून या कामाला मंजुरी मिळाली असून, कामाला सुरुवातही झाली आहे.



कडाव-माणकीवली रस्त्यावरील धोकादायक स्थितीत असलेल्या मोरीबाबत सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे कर्जत तालुका अध्यक्ष प्रभाकर गंगावणे यांनी कडाव ग्रामपंचायतीला कळवले होते. त्यानंतर सरपंच अशोक किसन पवार, उपसरपंच हर्षद भोपतराव, माजी सदस्य किसन पवार आणि रायगड जिल्हा परिषदेचे माजी सभापती अशोक भोपतराव यांनी तातडीने धोकादायक झालेल्या कडाव-माणकीवली रस्त्यावरील मोरीची पाहणी करून निधी उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न केले. कडाव ग्रामपंचायत आणि अशोक भोपतराव यांच्या प्रयत्नाने जिल्हा वार्षिक योजनेतून या कामासाठी मंजुरी मिळाली आहे.

त्यानुसार धोकादायक झालेली मोरी पाडून नव्या मोरीच्या नुतनीकरणाचे काम सुरु केल्याने माणकीवली ग्रामस्थांनी व सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर गंगावणे यांनी कडाव ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सभापती अशोक भोपतराव, कडाव ग्रामपंचायतीचे माजी सदस्य किसन पवार यांचे आभार मानले आहेत.

# प्रवाशांच्या सेवेसाठी मुरुड ते मुंबई, कल्याण एस टी सेवा सुरु होणार ; प्रवाशांना दिलासा

**दै.रायगड नगरी । मुरुड**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या रायगड विभागातील मुरुड आगारातर्फे प्रवाश्यांच्या सेवेसाठी व मुरुड आगाराचा आर्थिक तोटा भरून काढण्यासाठी अखेर गुरुवार दि. २७ मे पासून मुरुड-मुंबई व मुरुड- कल्याण बस सुरू करण्याचे निश्चीत झाले आले.

साधारण १५ एप्रिल लॉकडाउन काळापासून एस टी सेवा बंद करण्यात आली होती. त्यामुळे अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी व सामान्य नागरिक यांची प्रचंड गैरसोय होत होती, मुरुड तालुक्यातील ७२ गावांतील प्रवाशांना महागड्या खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागत होता. तसेच दिवसाला सुमारे चार लाख पन्नास हजार उत्पन्न देणारे मुरुड आगारही प्रचंड आर्थिक तोट्याला सामोरे जात होते. प्रवाशांचा



एस टी सेवा सुरू करण्याच्या मागणीचा जोर पाहून मुरुड आगार व्यवस्थापक सनील वाकचौरे यांनी सकारात्मक विचार करून २७ मे पासून प्रथम दोन गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये सकाळी ६.३० वा सुटणारी मुरुडहुन अलिबाग मार्गे मुंबई सेंट्रल गाडी परत मुंबईहून मुरुड कडे येण्यासाठी दुपारी बारा वाजता सुटेल. दुसरी गाडी मुरुड ते कल्याण दुपारी १२.३० वाजता सोडण्यात येणार आहे व तीच गाडी कल्याणहून सायंकाळी ५.०० वा. मुरुड कडे येण्यासाठी सुटेल. सध्या दोनच गाड्या सुरू करण्यात येणार असून प्रवाश्यांचा प्रतिसाद बघून गाड्यांच्या फेऱ्या वाढविण्यात येतील असे वाहतूक नियंत्रक प्रकाश दांडेकर यांनी सांगितले. तसेच कोरोना संदर्भात शासनाने नेमून दिलेल्या आरोग्य विषयक सूचनांचे पालन करून प्रत्येक गाडीचे निर्जंतुकीकरण केले जाईल व प्रत्येक प्रवासीकडे मास्क, सॅनिटाईझर, आधार कार्ड किंवा शासन मान्यताप्राप्त ओळ-खपत्र आवश्यक असल्याचे आगार प्रमुख यांनी सांगितले. साधारण दिड महिन्यांनी एस टी सेवा सुरू होणार असल्याने प्रवाश्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## १४ वर्षीय तरुणीवर अत्याचार, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१४ वर्षीय तरुणीवर अत्याचार केल्याप्रकरणी नितळस येथील प्रमोद जयराम पावशे( वय २५)याला अटक करण्यात आली आहे.

पीडित अल्पवयीन तरूणीने आरोपी प्रमोद पावशे याला भेटण्यास नकार दिला. त्यामुळे आरोपीने पीडित तरुणीला त्या दोघांच्या मैत्रीबद्दल घरच्यांना सांगण्याची धमकी दिली. आणि पीडित तरु-णीला भेटण्यास बोलावून किस करतानाचा फोटो काढला आणि तो घरच्यांना दाखवण्याची आणि सोशल मीडियावर पोस्ट करण्याची धमकी दिली. त्यानंतर प्रमोद पावशे याने त्याच्या चार चाकी गाडीत पीडित तरुणीसोबत अत्याचार केले. पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली.

# यंदा सर्वसामान्यांसाठी हापुस आंबट ; ५०० ते ६०० रुपये डझन

### अवकाळी पाऊस व गारपीटीने नुकसान ; उत्पादन व आवक कमी, लॉकडाऊनचा परिणाम

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

मागील वर्षी च्या निसर्ग चक्री वादळात आंब्याच्या झाडांची झालेली पडझड, खराब हवामान व गारपीट यामुळे हापूस आंब्याच्या उत्पादनात घट झाली आहे. याबरोबरच त्योक्ते चक्रीवादळाने झालेले नुकसान, कमी आवक आणि लॉकडाऊनचा परिणाम यामुळे यंदा हापूस आंब्याच्या किंमती ५०० ते ६०० रुपये डझनवर गेल्या आहेत. त्यामुळे हापूस आंबे खाणे सर्वसामान्यांसाठी अवघड होऊन बसले आहे.

गेल्या वर्षी मे महिन्यात ३०० ते ४०० रुपये डझनने हापूस आंबे मिळत होते. मागील वर्षी जूनमध्ये निसर्ग चक्रीवादळामुळे आंब्याची हजारो झाडे उन्मळून पडली. तसेच अवकाळी पाऊस आणि गारपीट यामुळे यंदा जिल्ह्यातील आंब्यांचे उत्पादन कमालीचे घटले आहे. आंब्याच्या उत्पादनात सुमारे ७० ते ८० टक्के घट झाली आहे.

त्यामुळे हापूस आंब्याची खूप कमतरता आहे. रत्नागिरी व देवगडचा हापूस देखील थेट वाशी मार्केटला व मोठ्या बाजारात जात आहे. त्यामुळे स्थानिक बाजारात हापूस कमी दिसत आहे. अनेक आदिवासी जंगलात किंवा परसबागेत लावलेल्या आंब्याच्या झाडावरील आंबे बाजारात टोपल्यांमध्ये घेऊन विक्रीसाठी येत असतात. विविध फार्म हाऊसच्या बागांमधील आंबे देखील विक्रीसाठी येतात. पण यंदा लॉकडाऊनमुळे तेही आले नाहीत. या जोडीलाच कर्नाटकी, पायरी, तोतापुरी, नीलम, गावठी (बिटके) छोटे आंबे आदी विविध प्रजातींचे आंबे देखील बाजारात उपलब्ध नाहीत.

यंदा हापूस आंब्याची आवक खूप कमी आहे. उत्पादन घटले आहे. त्यामुळे घाऊक बाजारात देखील माल उपलब्ध नाही. मागील वर्षी किंमती तुलनेने कमी होत्या. मात्र यंदा त्या खूप वाढल्या असल्याचे फळविक्रेते म्हणत आहेत.



## बँक ऑफ इंडियाच्या बोर्ली-मांडला शाखेत कॅश रिसायक्लर सुविधा उपलब्ध

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

बँकिंग क्षेत्रात अग्रेसर असलेल्या बँक ऑफ इंडियाच्या मुरुड तालुक्यातील बोर्ली-मांडला शाखेत पंचक्रोशीतील ग्राहकांसाठी कॅश रिसायक्लर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून या सुविधेचा अधिकाधिक लाभ घ्यावा. असे आवाहन शाखाधिकारी सौरभ पणशीकर यांनी केले आहे.

ग्राहकांना आपले आर्थिक व्यवहार अधिक सुलभपणे करता यावे. यासाठी बँकेत कॅश रिसायक्लर सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याने या सुविधेमुळे कोणत्याही प्रकारचा आकार न भरता दोन लाखांपर्यंत रक्कम जमा करता येईल तसेच बँक ऑफ इंडियाच्या कुठल्याही शाखेतील ग्राहकांना या मशीनद्वारे एटीएम कार्ड ने आपल्या खात्यातील जमा रक्कम बघता येईल व काढता येईल.

ही सुविधा ऑनलाईन असल्याने या साठी ग्राहकांना कोणता फॉर्म भरण्याची आवश्यकता नाही व रांगेत उभे राहाण्याचा त्रास नाही.असे शाखाधिकारी सौरभ पणशीकर यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

